लोकमत

## राष्ट्रीय पुरस्कार : पाच गोमंतकीयांचा समावेश; सर्वाधिक पुरस्कार कर्नाटकला

# ४४ उद्योजकांचा सन्मान!

लोकमत न्यूज नेटवर्क

**पणजी** : देशभरातील विविध राज्यांतील उद्योग व्यवसायात आपला ठसा उमटविणाऱ्या ४४ उद्योजकांना भारतीय राज्य औद्योगिक विकास आणि गुंतवणूक महामंडळ परिषदेच्या वतीने (कोसीडीसी) पाचव्या राष्ट्रीय पुरस्काराने शनिवारी सायंकाळी येथील तारांकित हॉटेलमध्ये गौरविण्यात आले. या सोहळ्यात छाप पाडली ती कर्नाटकने. या राज्यातील सर्वाधिक आठ उद्योजकांना हा पुरस्कार मिळाला, तर गोव्यातील पाच जणांनी या पुरस्कारावर नाव कोरले.

खासदार नरेंद्र सावईकर, आर्थिक विकास महामंडळाचे (ईडीसी) अध्यक्ष सिद्धार्थ कुंकळ्येकर, औद्योगिक विकास महामंडळाचे चेअरमन ग्लेन टिकलो, कोसीडीसीच्या चेअरमन स्मिता भारद्वाज, ईडीसीचे उपाध्यक्ष संतोष केंकरे, व्यवस्थापकीय संचालक सुरेंद्र येर्णेकर यांच्या उपस्थितीत या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

कोसीडीसीच्या चेअरमन भारद्वाज म्हणाल्या की, राज्यस्तरीय आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून नव्या उद्योगांना चालना मिळत आहे. अशा पुरस्कारातून अनेक युवावर्गांना प्रेरणा मिळत आहे. त्याचबरोबर उद्योजकांनाही पाठबळ मिळते. सध्या पंजाब नॅशनल बँकेमुळे बँकांची स्थिती आव्हानात्मक बनली आहे. त्यामुळे राज्याच्या आर्थिक विकास महामंडळाकडील कर्ज उद्योजकांना मोठे लाभदायक ठरणारे असून, दीर्घ मुदतीच्या कर्ज योजनाही उद्योग व्यवसायासाठी पूरक आहेत. महामंडळे गुणवत्तेला वाव देत असून, त्यातून रोजगार निर्मितीलाही हातभार लावत आहेत.

ईडीसीचे अध्यक्ष कुंकळ्येकर यांनी राज्यातील मुख्यमंत्री रोजगार योजनेचे कौतुक करीत, या योजनेची माहिती दिली. त्याचबरोबर ईडीसीची वसुली ९३ टक्के असल्याबद्दल कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले. सावईकर यांनी कर्नाटक राज्य आर्थिक विकास महामंडळाच्या कामाचे कौतुक केले. त्याचबरोबर येथील ईडीसीच्या कामाची प्रशंसा करीत प्रेरणादायी उद्योजकांच्या यशस्वी कथा मासिकांतून पुढे याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.

राष्ट्रीय पुरस्काराबरोबरच कोसीडीसी मेंबर कार्पोरेशन्स अटेंडिंग ॲवॉर्डचेही वितरण केले. त्यात देशभरातील १३ जणांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. गोव्यातील मुख्यमंत्री रोजगार योजना पुरस्कारांचे दहा जणांना वितरण करण्यात आले.



गणेश शेटकर

पणजी : उद्योग व्यवसायात ठसा उमटविणाऱ्या ४४ उद्योजकांना भारतीय राज्य औद्योगिक विकास आणि गुंतवणूक महामंडळ परिषदेच्या वतीने (कोसीडीसी) पाचव्या राष्ट्रीय पुरस्काराने शनिवारी सन्मानित केले. या वेळी मिता प्रशांत कामत यांचा गौरव करताना खासदार ॲड. नरेंद्र सावईकर. बाजूस इतर मान्यवर.

## गोव्यातील पाच जणांचा गौरव

या सोहळ्यात अनिल लोटलीकर (गोवा सिंटीरेड प्रॉडक्ट्स लि.), राजेश देसाई ॲंड स्मृती देसाई (रित्झ क्लासिक रेस्टॉरंट), मिता प्रशांत कामत आणि प्रशांत वसंत कामत (कामत ॲटोमोबाइल प्रा. लि.), व्हिक्टर आल्बेकुर्क (अल्कोन रिसॉर्ट होल्डिंग्स प्रा. लि.), श्रीकांत परुळेकर (अस्त्र कॉंक्रिट प्रॉडक्ट्स).

**मुख्यमंत्री रोजगार योजना पुरस्कार प्राप्त :** हेडरिच बॉस्को रोझारिओ (बेती), कविता कासकर (पर्वरी), लॉरिनो रझमान अंद्राद (सासष्टी), मोनिशा ओल्गा परेरा (साळगाव), पूनम रमाकांत परब (म्हापसा), रोहन दिवकर (हणजूण), श्रद्धा सावंत (कुंभारजुवे), शिलॉन सिक्सास (सासष्टी), सीताराम राऊत (पेडणे), विनाय दामले (डिचोली).

## QUICK NOTE

### COSIDICI National Awards to 5 Goan outstanding entrepreneurs



Entrepreneurs felicitated at the COSIDICI National Awards function held in the city recently

**PANAJI**: At the 5th COSIDICI National Awards function, hosted by EDC Limited at Hotel Fidalgo recently the Council of State Industrial Development and Investment Corporations of India (COSIDICI) the National Federation of State Level Financial and Industrial Institutions honoured 44- entrepreneurs from all over the country who started small but have achieved recognition in their chosen field. The following 5 Goan entrepreneurs financed by EDC Limited also received these National Awards under different categories. Victor Albuquerque, Alcon Resorts Holdings Pvt Ltd, Anil Lotlikar, Goa Sintered Products Ltd, Rajesh Dessai and Smruti Dessai, Ritz Classic Restaurant and Bar, Meeta Kamat and Prashant Kamat, Kamat Automobile Pvt Ltd, Shrikant Parulekar, Astra Concrete Products. *NT*


NOW, therefore, notice is hereby given to you U/order V Rule 20(1-A) of C.P.C to appear before this Court either in person or by a pleader duly instructed, if any on **13th day of April, 2018 at 10.00 a.m.** to answer the claim and further you are hereby directed to file your W.S on that day.

TAKE FURTHER, notice that in default of your appearance on the day and time aforementioned, the matter will be heard and determined in your absence.

GIVEN under my hand and the seal of the Court, this 5th day of March, 2018.

Sd/- SEAL

(Shantashir S. Sinai Kudchadkar)
Civil Judge, Jr. Div., 'E' Court Mapusa

TENDER NO

GOVERNMENT O

ELECTRICITY DEP

OFFICE OF THE CHIEF ELEC

1) Tender No.28(17-18)/CSC - Work of
overhead line into underground system n
oncho Amo upto Gurudas Dabale house
DTC at Muddowaddo.
2) Tender No.29(17-18)/CSC - Work of L
XLPE underground cable from Candolim
available on following websites from 07-
www.etender.goa.gov.in & www.tenderw
For queries e-mail to: csc14ged@gmail.

Date:-06-03-2018
Place: Panaji, Goa